# १९६० ते १९९० या कालखंडातील दलित कवितेतून व्यक्त होणारी वर्गबदलाची जाणीव

**डॉ. वैशाली विजय जावळेकर**
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी यांचे डी. जी. रुपारेल, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, माहीम, मुंबई
Email - vaishali.jawalekar@ruparel.edu
Mob.No - 9869477237

---

**प्रस्तावना :**

साहित्याचा समाजवास्तवाशी परस्परसंबंध असतो या गृहीतकावर आपण साहित्याचा समाजलक्ष्यी अभ्यास करतो. हिपोलित तेन आणि मार्क्सवादी विचारवंतांनी साहित्य-समाजसंदर्भात वेळोवेळी ज्या अनेकांगी भूमिका घेतल्या आहेत त्या भूमिकांच्या परिप्रेक्ष्यात दलित कवितेतील सामाजिकतेचा अवकाश येथे उलगडणार आहोत.साहित्यातील आशयद्रव्य 'स्थळ -काळ', वातावरण किंवा जीवन जाणीव यांनी आकाराला येत असते असे आपण मानतो. आशयाला जसा एका काळाचा संदर्भ असतो तशी एका कालावकाशात सृजनशील लेखकाची सुद्धा जडणघडण होत असते. कवीला आपण एका काळाचे अपत्य मानले तर त्याच्या अभिव्यक्तीतून भोवतालच्या भौतिक, सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाविषयीचे निरीक्षण चिंतनशील प्रतिक्रिया व्यक्त होणे साहजिक आहे.आपण साहित्याला समाजाचे प्रतिबिंब मानले नाही तरी समाजाच्या संदर्भावकाशात साहित्यातील जीवनजाणिवा आपण उलगडत असतो. भौतिक, सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतर साहित्याच्या निर्मितीवर प्रभाव टाकते, हे गृहीत धरून आपण १९६० ते १९९० या कालखंडातील तीन प्रमुख कवींच्या कवितांमधून व्यक्त होणारी वर्गबदलाची जाणीव तपासणार आहोत.

**१९६० ते १९८० चा कालखंड** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणीत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्रिसूत्रीला आधारभूत मानून सत्ताशास्त्रीयदृष्ट्या सर्वांत खालच्या पायरीवर असलेल्या लोकसमूहातील तरुण शिक्षित होऊन कलात्म सर्जनाच्या दिशेने कार्यरत झाला. 1960पूर्वीपासूनच दलित कविता प्रकटू लागली होती. मात्र 1960 पासून मराठी काव्यप्रवासात दलित कविता प्रभावीपणे आपले वाङ्मयीन व वाङ्मयेतर योगदान भरभरून देऊ लागली. १९६० ते १९८० या कालखंडातील दलित कविता ही 'गावकुसाबाहेरच्या उपेक्षित जगण्याचा अनुभव मांडणारी आणि परिवर्तनवादी भूमिका घेऊन विद्रोह करणारी, क्रांतिकारक आशय मांडणारी कविता म्हणूनच अभ्यासली गेली. दलित कविता ही समाजबदलाचे आयुध मानून, जातीअंताच्या समाजवास्तवाचे स्वप्न या कवितेने पाहिले. त्यासाठी 'शहराकडे येणे' ही कृती जातीअंताच्या लढ्याचाच एक भाग होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शहराकडे चला हा संदेश दलित समाजाला आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक प्रतिष्ठा देणारा जीवनमार्ग होता.

शहराकडे झालेले स्थलांतर आणि शिक्षणाची, नोकरी-व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणे ही बाब त्याच्या सामाजिक स्तरीकरणाला चालना देणारी ठरली. दलित सुशिक्षित तरुणाचे शहरात स्थिरावणे आणि मध्यमवर्गात स्तरबदल होणे हा प्रवास हा सोपा नव्हता. शिक्षणाच्या बिकट वाटेवर चिकाटीने वाटचाल केलेल्या आणि त्यानंतर जातसंदर्भासह वर्गव्यवस्थेत दाखल झालेल्या संवेदनशील व्यक्तिठायीची द्वंद्वात्मकता दलित कवितेत वारंवार व्यक्त झाली आहे. हे द्वंद्व अत्यंत स्वाभाविक आहे. शहराकडे स्थलांतरित झालेल्या दलिताला काही वेळेस 'जात चोरून रहावे लागले आहे. संविधानाने प्रस्थापित केलेली सामाजिक न्यायाची कवचकुंडले नागर समूहात आपले 'अस्तित्त्व' टिकवताना कशी आश्वासक वाटतात .त्यामुळे येणारे समाजभान किंवा शहरात सामाजिक प्रतिष्ठा मिळवताना 'जात' या वास्तवाशी कसा सामना करावा लागतो असा जीवनानुभव दलित कवितेतून व्यक्त होणे अपेक्षित आहे. हा जीवनानुभव कवी केशव मेश्राम आणि दया पवार यांच्या कवितांमधून ठळकपणे व्यक्त झाला आहे .

**1974 मध्ये प्रसिद्ध झालेल्या दया पवार यांच्या 'कोंडवाडा'** या संग्रहातील कविता भोवतालच्या समाजवास्तवावर टीकात्म भाष्य करतात. 'कोंडवाडा'मधील कवितांमधून शहरातल्या दलित वस्ती आणि दलित माणसाच्या शहरात रुजवण्याचा-टिकवण्याचा संघर्ष सातत्याने व्यक्त झाला आहे. शहराकडे स्थलांतरित झालेली दलित वस्ती म्हणजे मूलभूत सुविधांचा अभाव असलेली झोपडपट्टी असते. आपली भूमी, घर नसलेले लोकं रोजगाराच्या शोधात मुंबईत आले पण इथले जगणे गावकुसाबाहेरच्या जिण्याचे होते.

'डबक्यात शेवाळासारखी पसरलेली',
आहे ना अजब नगरी, एका खोलीत तीन चुली
तिच्या रित्या कोपऱ्यात संसाराची आरास मांडली
म्हणालीस, किती हे गचपन रात्रीला झोपावे कसे?" (पहिली रात्र, गस्त नसलेली वस्ती, पृ. 16)

यांसारख्या काव्यचरणांतून हा संघर्ष व्यक्त झाला आहे. शहरात आलेल्या दलिताला 'कामगार' हीच सामाजिक ओळख मिळते.एकीकडे जगण्याचा संघर्ष तर दुसरीकडे 'जात आणि वर्ग' यांच्या पाशातून मुक्त होत मानवतावादी जीवनमूल्यांच्या हक्कासाठी लढणारा दलित नायक आपल्याला दिसतो. शहरात स्थिर झालेला हरिजन कांबळे गांधी जन्मशताब्दीला प्रसाद वाटतो तेव्हा -

"विजेचा शॉक बसावा
तसे अनेक हात आखडतात
गांधीच्या जयजयकारात
खात्याखात्यात कामगार परतले (गांधी जन्मशताब्दी, पृष्ठे 21-22)

'शहर' यांसारख्या कवितांमधून 'शहरे' ही छुप्या जातियवादाची, सामाजिक विषमता रूजलेलीच असल्याचे अधोरेखित करतात. दया पवार यांच्या 'पाणी कुठंवर आलं ग बाई' (1998) या संग्रहातील 'बाबा, काल परवाची गोष्ट' या कवितेत कवितागत 'मी' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी संवाद साधतात. डॉ. आंबेडकर यांनी दलितांना आत्मसन्मानाने जगता यावे म्हणून गावगाड्यातून मुक्तीचा मार्ग सुचवताना शहराकडे चला असा सल्ला दिला.

शहरामध्ये धर्मांधता नाही, कर्मकांड नाही, अस्पृश्यतेच्या इंचू-इंगळ्याचे पेव (असणार) नाही (पाणी कुठंवर आलं ग बाई, पृ. 6) असा विश्वास डॉ. आंबेडकर यांना वाटत होता. त्यांनी दिलेला हा व्यक्तिविकासाचा, समान संधी प्राप्त करून घेण्याचा सल्ला स्वीकारून खेड्यापाड्यातील विषमताग्रस्त दलित समाजाने शहराची वाट धरली. शहरांमध्ये दलित वर्गाने स्वविकासाची काही अंशी संधी प्राप्त झाली आणि दैनंदिन जीवनातील गुलामीतून हा समाज काहीसा मोकळी झाला पण जाता नाही जात याचा प्रत्यय सुद्धा आला.

**दया पवार यांच्याप्रमाणेच प्रा. केशव मेश्राम यांच्या कवितांमधून** नवशिक्षित दलित तरुणाची शहरी-मध्यमवर्गीय वास्तवात जगतानाची परात्मता व्यक्त होते. ज्या सुशिक्षित दलित तरुणाने गावकुसाबाहेरच्या विषमता अनुभवलेली आहे. त्यामुळे होणाऱ्या वेदना प्रत्यक्षात भोगलेल्या आहेत अशा तरुणाला शहरात काही अंशी स्वविकासाची समान संधी प्राप्त होण्याची शक्यता दिसू लागते तेव्हा तो जातीअंताच्या शहरी चळवळींमध्ये प्रत्यक्ष सामील होऊ पाहातो. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत जेव्हा एखादी व्यक्ती 'वर्ग'बदलाच्या वास्तवाला सामोरी जाते तेव्हा तिला 'स्व'विषयक एका विभ्रमाला, संघर्षाला भिडणे अपरिहार्य ठरते. अशा प्रसंगीची 'संघर्षाची' जाणीव अनेकदा केवळ वैयक्तिक राहत नाही. ती एका स्थलांतरित व वर्ग-स्थानांतरित होऊ पाहणाऱ्या समूहाची जाणीव असते. या अशा संघर्षात 'स्व'प्रतिमेचा शोध घेणे आणि ती घडवणे अपरिहार्य ठरते. दया पवार आणि केशव मेश्राम यांच्या कवितांमधून या प्रकारचा संघर्ष केंद्रस्थानी आलेला आहे. दया पवार यांची 'कोंडवाडा'मधील 'वस्ती' (पृ. 25) आणि केशव मेश्राम यांची 'उत्खनन'मधील 'आमची वस्ती' (पृष्ठे 23-24) या कवितांचे आपण एकत्रित वाचन केले तर 'स्व'शोधाची, 'नवअस्मितेच्या' जाणिवेची कवितागत 'मी'ची अभिव्यक्ती सहजपणे लक्षात येते. दया पवार यांच्या 'वस्ती' या कवितेत दलित वस्ती सुधार कार्यक्रमात 'पिंडाला कावळा शिवतात तसे 'ते' वस्तीला शिवले; गळ्यात गळा घालून स्नॅप खेचले आणि अभिसरण व्हावे कसे' यावर परिसंवाद साधत परतले.' असे निरीक्षण कवितागत 'मी'ने नोंदविलेले दिसते तर 'आमची वस्ती'मध्ये -

'भांबावतात सुधारणा आमच्या वस्तीत,
ठेचाळतात रस्ते, योजनाही अडखळतात,
... आत्ता... आत्ताशा थोडे वाचतात 'मुलगे लिहितात'

असे वास्तव कवितागत 'मी' नोंदवितो. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही गाव असो अथवा शहर येथील दलित वस्त्या सर्व सोयीसुविधांपासून वंचितच राहिल्या हे वास्तव ठळकपणे सामोरे येते.

दया पवार यांच्या 'टेरीलीन शर्टातला मी' (कोंडवाडा, पृ. 27), 'शहर' (पृ. 38), 'सिद्धार्थ नगर' (पृ. 44), 'पहिली रात्र' (पृ. 18) या सगळ्या कवितांमधून कवितागत 'मी'चा भूतकाळ, त्याचा वर्तमान, त्याचे गावकुसाबाहेरील जगणे तसेच त्याचे शहरातील जगणे यांमुळे निर्माण झालेले द्वंद्व साकारले आहे.

'वर्गबदल', 'स्थलांतर' ही घटना कोणत्याही व्यक्तीच्या भावविचारविश्वावर परिणाम घडविणारी असते. गावाकडून शहराकडे स्थलांतर करणे म्हणजे एका संदर्भावकाशातून संपत जाणे, जुन्या व्यवस्थेकडून तुटत जाणे आणि नव्या स्थलांतरित शहरातल्या नव्या व्यवस्थेशी जुळवून न घेता येणे अशा एका व्यामिश्र जंजाळात अडकलेली भाववृत्ती मेश्राम यांच्या कवितेत अभिव्यक्त होते. तेव्हा ही भाववृत्ती प्रस्थापित जात व शहर या दोन्ही व्यवस्थांच्या प्रारूपाशी संबंधित असते. हे येथे लक्षात घ्यायला हवे.

केशव मेश्राम यांच्या आरंभाच्या कवितासंग्रहापासून अखेरच्या कवितासंग्रहा-पर्यंतच्या कवितांमधून जातीअंताच्या लढ्यामुळे प्राप्त झालेला परिवर्तनवादी विचार अनेकांगांनी व्यक्त झाला आहे. मात्र मेश्रामरचित कवितांमधील 'मी' अनेकदा हे द्वंद्व पेलताना दिसत नाहीत. स्वाभाविकपणे त्यातून त्रागा निर्माण होतो आणि असे झाले की, 'आजीची गोष्ट' (पृ. 8) या कवितेत आजी आणि नातू यांमधील वैचारिक अंतर व्यक्त होते.

"गाडाभर रद्दी खरवडून
महाकवी बनवणाऱ्या देशात...बेटा तू का पैदा झालास?
गाडा ओढ, पेटव रद्दी... एवढ्यासाठी त तू आलास...
बेटा! मान्साले मानूस कर... तरच तू शाईर झालास...
आमच्या घरात आलास, आता रडू नको हास! (जुगलबंदी, पृ. 8)

जातसंस्कारात वाढलेली आणि त्याचा स्वीकार केलेली आजी नातवाची समजूत घालताना त्याला 'तू माणसाला माणूस करू शकलास तर शाईर होऊ शकशील', असे सांगते तेव्हा एका अर्थाने ती मानवतेचाच स्वीकार करते. मानवतेचा स्वीकारच व्यक्तीला जातीअंतापर्यंत घेऊन जाईल असा विश्वास ती त्यातून व्यक्त करते असे म्हणायला हरकत नाही. शहरात आलेली ही आजीची दलित पिढी आपला भूतकाळ मागे टाकून वर्तमान घडवत असताना परिवर्तनवादी क्रांतिकारक अशी जीवनजाणीव व्यक्त करताना दिसते.

शहरात स्थिरावताना बाह्य परिवेश बदलला, आर्थिक सबलता प्राप्त झाली म्हणजे राहणीमान बदलते म्हणून 'वर्ग' बदलात जातीला दूर सारता येत नाही.मध्यमवर्गीय होणे म्हणजे स्वतःचे कृतक रूपांतरण करणे. वर्गीय मान्यता मिळवण्यासाठी आपला भूतकाळ कसा नाकारावा याविषयी मानसिक द्वंद्व निर्माण होते.हे द्वंद्व मेश्रामांच्या कवितागत 'मी'ला जसे टाळता आलेले नाही तसेच ते लौकिकातील कवी मेश्रामांनाही टाळता आलेले नाही . कवीला आत्मनिरीक्षणांती 'स्व'विषयक जे भान येते. ते भान त्याला आत्मवंचनेच्या पातळीवरही आणते. कारण आपल्या अवतीभवतीचे संवेदनशील दलित कवी व्यवस्थेच्या विरोधात जाऊन जे लेखन करीत आहेत तसे आपल्याला शक्य होत नाही म्हणून त्यांना मानसिक पातळीवरील संघर्षाला भिडावे लागते. याप्रकारचा संघर्ष मेश्राम यांच्या 'चरित' (1989) या चरित्रात्मक कवितेतून साकारले आहे. वास्तविक त्यांच्या 'उत्खनन' या काव्यसंग्रहातील 'एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली' (पृ. 74) असा कबुलीजबाब कवितागत 'मी' देतो तेव्हा तो पारंपरिक धर्मव्यवस्थेतील परमेश्वराला नकार देतो. अन्याय्यग्रस्त व्यवस्थेला नाकारण्यात विद्रोहच सामावलेला आहे. केशव मेश्राम यांच्या कवितेतील 'मी' 'कृतक पुत्र' न होण्याची याची सजगता बाळगतो. त्यामुळे कठोर आत्मपरीक्षण करणारे कवितागत मन आत्मटीका करताना दिसते. शहरात कवी म्हणून प्रस्थापित होताना आपण आपण विचारप्रणालीशी होणारी प्रतारणा करतो आहोत याची जाणीव व्यक्त होते.

"गुर्कावते अंतरमन सफारीच्या पिंजऱ्यात ....
.....भगोड्या ! तुझ्यापुर्ता तू कुत्तरडा सुखलोलुप
गर्दीत महानगराच्या भिनलेला अलिप्त
मायबाप मेलेत जुन्या घरच्या गावात
....काय आता: कुणासाठी ....फळवतोयस शब्द ?(पृ.५३ ,रात्र)

भारतीय राज्यघटनेने सर्व भारतीयांना व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही चतु:सूत्री देऊ केली आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला ही चतु:सूत्री देऊ करूनही कनिष्ठवर्गीय आणि जातउतरंडीत सर्वात खालच्या पायरीवर असलेल्या व्यक्तींना कोणतेच स्वातंत्र्य लाभलेले नाही. हे वास्तव स्वातंत्र्योत्तर तीस-चाळीस वर्षांच्या कालखंडानंतर स्पष्टपणे दृग्गोचर होऊ लागले. सर्जनशील व्यक्ती या स्थितिगतीचे मूल्यन करू लागली. मेश्राम यांच्या काही कवितांमधून हे मूल्यनही काव्यात्म रूपात प्रकटले आहे.

"सूर्य मावळायला किती वर्षे झालीत?
जगात लोकशाही व्यवस्था यायला
किती अब्ज वर्षे लागतील? (प्रयाणसुक्त, जुगलबंदी, पृ. 65)

अशा प्रकारे शहर, महानगर, यांच्या सीमा ओलांडून दलित कविता सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडींच्या संदर्भाने राज्य आणि देश या पातळीवरचे दलित वास्तव आणि त्यातील आंतरिक बदल यांचे चिकित्सक आकलन करून घेत असल्याचे चित्र दिसते.

**भारतासाठी 1980 चा कालखंड हा राजकीयदृष्ट्या अराजकतेचा होता**. जातीय, वांशिक दंगली व त्यांचे राजकारण, धर्मांधतेचे राजकारण, सर्वत्र फैलावलेला भ्रष्टाचार या सर्व घटितांविषयी दलितत्वातून बाहेर येऊन मेश्राम आपल्या कवितांमधून चिंतन-मनन व्यक्त करतात. 'जुगलबंदी'मधील 'माझा देश म्हणजे तुम्हीच सांगा' (पृ. 37), "पहा रे पोरांना' यांसारख्या कविता धर्मांधतेच्या राजकारणाकडे लक्ष वेधून घेत त्यावर टीका करतता तर 'अकस्मात' काव्यसंग्रहातील 'ताकीद कृष्णमेघांना' (पृष्ठे 64-65) 'तो गेल्यानंतर' (पृ. 62), 'त्या देशाची परंपरा' (पृष्ठे 53-55), 'चरित' काव्यसंग्रहातील 'खेरवाडी: भर उजेडात' (पृ. 19) आणि 'इंदिरा : 1985' या कवितांचे 'मी' विविध सामाजिक-राजकीय स्थित्यंरांचा वेध घेताना दिसतात. एकूण सामाजिक संदर्भातून मेश्राम यांच्या कवितांचे अवलोकन केले तर या कविता भूतकाल ते वर्तमान अशा काळातील अनेकानेक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संदर्भांना भाववैचारिक पातळीवर अभिव्यक्त करते.

1980 नंतरच्या कवींसाठी 'अस्पृश्यता' हा त्यांच्या जीवनजाणिवेतला थेट प्रभावी घटक नसला तरी त्यांना भोवताली जातजाणीव छुप्या पद्धतीने व्यक्त होत असल्याचा अनुभव येतच होता. वर्तमानात शहरातल्या झोपडपट्टीत दलितांचे मूलभूत सुविधांचा अभाव असलेले 'काल'च्या गावकुसाबाहेरच्या जिण्याचेच वास्तव होते. वर्तमानपत्रातील बातम्या या दलित वस्तींची जाळपोळ, सामूहिक बहिष्कार, बलात्कार अशा घटनांनी अस्वस्थ करणाऱ्या होत्या. त्याच बरोबर नामांतराची चळवळ, दलितांवरील अत्याचार, पँथरमधील फाटाफूट यांमुळे ही चळवळ दिशाहीन होऊ लागल्याचे चित्र दिसत होते .या पार्श्वभूमीवर  दलित कविता एका संक्रमणाच्या कालखंडातील दलित जीवनानुभव रेखाटत असलेली दिसते. या काळाला प्रतिसाद देणारे कवी म्हणून अरुण काळे यांच्या कवितेचे विशेष आपण विश्लेषित करू.

अरुण काळे यांच्या काव्यप्रतिभेला दलित चळवळीसमोरची दोन आव्हाने जाणवलेली दिसतात. एक म्हणजे दलित वर्गातल्या नेत्यांचा वर्गविद्रोह आणि दुसरे दलित माणसाचे दलित्वाच्या प्रश्नापासून दूर जाणे, ही होत. 'रॉक गार्डन' या कवितासंग्रहातील 'पायाच्या पुण्याईनं' (पृ. 49) कवितेतील निवेदक 'साहेब, तुमच्या पायाच्या

पुण्याईन' आपल्या आयुष्यात भौतिक सुखसंपन्नता कशी आली हे कोणाला उद्देशून सांगतो आहे हे लक्षात घेतले तर या निवेदकाचे वास्तवाविषयीचे आकलन आपल्या लक्षात येते.

'रॉक गार्डन' या कवितासंग्रहातील' झाला महार'(पृ. 89) या कवितेत मध्यमवर्गीय झालेला दलित 'आपला भूतकाळ विसरून सत्यनारायणाच्या सार्वजनिक पूजेला बसतो,' आई-बाप, जातबांधव यांना टाळतो पण लग्न, मौतीत जातीचा आसरा घेतो, हे बदलत्या दलितवर्गाचे वास्तव कवितागत 'मी' वाचकासमोर ठेवतो. पण खरे तर बदलत्या राजकीय धोरणांमुळे दलितांना 'वर्ग'बदल करणे शक्य झालेले असले तरी त्यांना जन्मत: चिकटलेली जात सोडून देता येत नाही. एखाद्याने तसे करावयाचे ठरवलेच तर समाज त्याला तसे करू देत नाही, हे समाजातील एकाच वेळी 'झाकलेले' व 'उघड' असलेले वास्तव या कवितेतून व्यक्त होते. असेच वास्तव उपहास-उपरोधगर्भ शैलीत 'शेपटीची कविता'(पृ. 101)मधील 'मी'-

"बा पूर्वजा! उतरंडीवादाबरोबरच  
जातीयवाद, नेतावाद, भक्तवाद, सत्तावाद  
माजवाद पेरला असतास  
तर शेपटी बहुउद्देशीय योजनेप्रमाणे

कामी आली असती गळून पडली नसती." (पृ. 101) अशा शब्दरचनेतून साकारतो. 1980-90च्या दशकात 'गँगवॉर' हे जसे महानगरातील एक धगधगते वास्तव होते तसेच जातीय दंगली हेही एक भयकारी वास्तव होते. अरुण काळे यांच्या 'सायरनचे शहर'मधील शीर्षक कवितेत (पृ. 10) दंगलीनंतरची स्मशानशांतता, शहरांमधून वारंवार लागणारे कर्फ्यू, दंगलतज्ज्ञांचा अभ्यासदौरा, ॲम्ब्युलन्स, फायरबिग्रेड, पायलट या गाड्यांचे सायरन यांमुळे वातावरणात निर्माण होणाऱ्या तणावांचे चित्रण येते.अरुण काळे आपल्या कवितेतून एकीकडे शहरातील हिंसेचे चित्रण करतात तर दुसरीकडे 'हे शहर; आलेल्या प्रत्येकाची अन्न, वस्त्र, निवारा ही गरज पूर्ण करते आणि त्याचवेळेला हे शहर कोणाचेच नसते', ही बाब निर्वासित शहरात येणाऱ्या सर्वहारा वर्गाच्या लक्षात आणून देतात. उदाहरणार्थ, सायरनचे शहर मधील 'हे शहर आपलं कसं नाही' (पृ. 11)या कवितेचा आशय.

अरुण काळे यांच्या कवितेने जागतिकीकरणाने दलित, सर्वहारा वर्गासमोर निर्माण केलेल्या सर्व आव्हानांची लक्षणीय दखल घेतलेली आपणास दिसते.त्यांचाची कविता 'ग्लोबल गावकूस' आपल्या कवितेच्या अवकाशात बांधू पाहते.

**समारोप** :

१९८० ते १९९० नंतरच्या काळामधली दलित कविता केवळ स्वत: जन्मदत्त जातीच्या कुंपणात फिरत राहत नाही. केवळ वर्गीय जाणिवा व्यक्त करणारी उरत नाही तर ती सर्वच प्रकारच्या शोषितांचा आत्मस्वर होताना दिसते आहे. अर्थातच दलित, पददलित आणि स्त्रिया या सर्वांचे होणारे दमन आजही थांबलेले नाही. या मूळ प्रश्नांच्या बरोबरीनेच विविध प्रकारचा दहशतवाद, धार्मिक हुकुमशाही, बहुसंख्याकवाद तसेच धार्मिकतेच्या आधाराने घडणारे समाजाचे ध्रुवीकरण यावर भाष्य करण्याची राजकीय भूमिका दलित कविता घेते आहे.

**निष्कर्ष :**

- स्वत:च्या व स्वसमाजाच्या हालअपेष्टांना काव्यपातळीवर मूर्त करणे आणि त्यातून आपले 'माणूस' असणे सिद्ध करणे, साहित्य हेच सामाजिक न्याय मिळविण्याचे एक माध्यम आहे, याची सर्व समाजाला जाणीव करून देणे. हे दलित साहित्याचे उद्दिष्ट १९६०-१९८० पर्यंतच्या कवितेतून प्रतिबिंबित होते.
- 'शहर' हे भौगोलिक परिमाण व्यक्तीला ज्ञान, रोजगार, काही अंशी सामाजिक स्वातंत्र्य देते. १९६० नंतर रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर झाले.दलित साहित्याने सर्व स्तरांतील दलित स्थलांतरितांचे महानगरातील कष्टप्रद जीवन वाचकासमोर ठेवले.
- कवितेतील 'मी' स्थलांतरित तरुण असून तो शहराशी न जुळण्याच्या अनुभवाबरोबर आपल्या उपरेपणाची वेदनाही शब्दबद्ध करतो. शहरातल्या 'मध्यमवर्गीय'-नोकरदार या बिरुदाखाली जगणाऱ्या माणसाचे स्वत्व हरवून गेले आहे ही भावना व्यक्त होते.
- प्रस्तुतच्या कालखंडातील दलित कवींचे आत्मपरीक्षण, स्वसमाजपरीक्षण आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदलणाऱ्या सभोवतालच्या स्थितिगतीचे सूक्ष्म अवलोकन करणे आणि परीक्षणाअंती, अवलोकनाअंती हाती येणारे समाजवास्तवाविषयीचे निष्कर्ष काव्यात्म रूपात व्यक्त करण्याची जबाबदारी पार पाडलेली दिसते.

**संदर्भ सूची :**


- पवार दया, (1974), कोंडवाडा, मेहता पब्लिकेशन्स, पुणे.
- पवार दया, (1991), पाणी कुठंवर आलं ग बाई, मेहता पब्लिकेशन्स, पुणे.
- मेश्राम केशव, (1977), उत्खनन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
- मेश्राम केशव, (1982), जुगलबंदी, परिमल प्रकाशन, औरंगाबाद.
- अरुण काळे'रॉक गार्डन (१९९३ )प्रबोधन प्रकाशन ,नागपूर
- अरुण काळे -(1997) 'सायरनचे शहर' (1997)सत्यजित प्रकाशन नागपूर
- अरुण काळे-(2006)'नंतर आलेले लोक' (2006) लोकवाङ्मय गृह ,मुंबई
- अरुण काळे-(2008) 'ग्लोबलचं गावकूस' (2008) लोकवाङ्मय गृह,मुंबई


Research Hub International Journal